## <u>मुंबईमध्ये व्यवसाय करणे सुकर होण्याबाबत- वीज दर्शक मिळण्याकरिताचा बेस्टचे दर्जा सुधारणेतील योगदान</u>

मुंबईमध्ये व्यवसाय करणे सोपे करण्याकरिता आणि जागतिक बँकेच्या व्यवसाय करा या अहवालात भारताचा दर्जा सुधारण्याकरिता, १०० केडब्ल्यू ते १५० केडब्ल्यूच्या वाणिज्यिक आणि औद्योगिक प्रवर्गाअंतर्गत आवश्यक अर्जांची सुरळीत कार्यपध्दती विविध सुधारणांची ओळख आणि कार्यपध्दती आदेश देण्यात आले होते. याद्वारे अर्जांच्या कार्यपध्दतीकरिता पाय-यांची संख्या कमी करुन ती ३ वर आणि आवश्यक दस्तऐवजांची संख्या कमी करुन ती २ दस्तऐवजांवर म्हणजे एक भोगवटा पुराव्याकरिता आणि अन्य ओळख पुराव्याकरिता. विद्युत जोडणी आवश्यक दस्तऐवज जोडण्याक रीता आणि एनइएफटी / आरटीजीएसद्वारे प्रदान करण्याकरिता, ऑन लाईन अर्ज सादर करण्याकरिता आमच्या संकेत स्थळावर ऑनलाईन सुविधा उपलब्ध आहे. लागूभारावर आधारित अंदाजित स्थिर खर्चाची अंमलबजावणी केलेली आहे. आता ऑनलाईन अर्ज भरतेवेळी, अर्ज प्रपत्रात जेव्हा अर्जदाराने एकूण आवश्यक भाराची नोंद करताच ऑन लाईन अर्ज प्रपत्रामध्ये भरावयाची आवश्यक रक्कमेची नोंद (अर्ज प्रक्रिया शुल्क, जोडणी शुल्क आणि सुरक्षा ठेव यांची बेरीज) अर्जदाराला दिसते.

वाणिज्यिक आणि औद्योगिक प्रवर्गाअंतर्गत १०० कि.वॅट आणि अधिकच्या नवीन जोडणीकरिता लागू भारासाठी आवश्यक जोडणी दस्तऐवजासह आणि आरटीजीएस / एनइएफटीद्रारे प्रदानाने ऑनलाईन अर्ज प्राप्त होताच, आता त्वरीत प्रक्रियेने जेथे केबल टाकणे आवश्यक आहे तेथे १५ दिवसात आणि जेथे केबल टाकणे आवश्यकता नाही तेथे ७ दिवसात विद्युत पुरवठा जोडणी केली जाते.

वरील सुधारणांच्या अंमलबजावणीमुळे, जागतिक बँकेच्या व्यवसाय करा अहवालात विद्युत निर्देशकाचा दर्जा सुधारुन तो २०१६ या वर्षातील ५१ वरुन २०१७ मध्ये २६ झाला होता.

---------------

SECY१५/LOT No.१ despande ७०/amd